## MAHARASHTRA ACT No. I OF 1988

### THE MAHARASHTRA DEBT RELIEF (RETROSPECTIVE EXTENSION OF DURATION OF CERTAIN CHAPTERS) ACT, 1987.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमात राष्ट्रपती यांची संमती दिनांक ९ जानेवारी १९८८ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

डी. एन. चौधरी,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. I OF 1988

### AN ACT FURTHER TO EXTEND THE DURATION OF CHAPTERS IV AND V OF THE MAHARASHTRA DEBT RELIEF ACT, 1975.

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात", दिनांक १५ जानेवारी १९८८ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला].

**सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १**

**महाराष्ट्र ऋणग्रस्ततेपासून मुक्तता अधिनियम, १९७५ यांची प्रकरणे चार व पाच यांची मुदत वाढविण्यासाठी अधिनियम**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र ऋणग्रस्ततेपासून मुक्तता अधिनियम, १९७५ याची प्रकरणे चार व पाच यांची मुदत वेळोवेळी वाढविण्यात आली होती व ती मुदत २१ ऑगस्ट १९८७ रोजी समाप्त झालेली असल्यामुळे यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी भूतलक्षी प्रभावाने ती मुदत आणखी वाढविणे इष्ट आहे, **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अडतिसाव्या वर्षी याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१९७६ चा महाराष्ट्र ३. — संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास 'महाराष्ट्र ऋणग्रस्ततेपासून मुक्तता (विवक्षित प्रकरणांच्या मुदतीत भूतलक्षी प्रभावाने वाढ करणे) अधिनियम, १९८७' असे म्हणता येईल.

(२) तो, दिनांक २१ ऑगस्ट १९८७ पासून अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १४-अ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र ऋणग्रस्ततेपासून मुक्तता अधिनियम, १९७५ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम १४-अ मधील "२१ ऑगस्ट १९८५ हा दिवस धरून त्या दिवशी संपणाऱ्या मुदतीसाठी" या मजकुराऐवजी "२१ ऑगस्ट १९८९ हा दिवस धरून त्या दिवशी संपणाऱ्या मुदतीसाठी" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सुधारणेच्या पूर्वलक्षी प्रभावाचे परिणाम.

३. (१) याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, जी २१ ऑगस्ट १९८७ नंतर समाप्त होणार होती व जी या अधिनियमाद्वारे भूतलक्षी प्रभावाने, त्या तारखेपासून २१ ऑगस्ट १९८९ हा दिवस धरून त्या दिवसापर्यंत वाढवण्यात आलेली आहे आणि शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे जी दोन वर्षांपेक्षा अधिक नसेल एवढ्या कालावधीकरिता आणखी वाढविण्याचे अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आले आहेत अशी, मुख्य अधिनियमाची प्रकरणे चार व पाच यांची मुदत ही कोणत्याही वेळी समाप्त झाल्याचे मानण्यात येणार नाही आणि या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेले त्या प्रकरणांचे सर्व उपबंध विधिग्राह्य, परिणामकारक व अखंडपणे अंमलात असल्याचे मानण्यात येईल.

(२) याद्वारे आणखी असे घोषित करण्यात येत आहे की, २२ ऑगस्ट १९८७ ते हा अधिनियम शासकीय राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या तारखेपर्यंतच्या (दोन्ही दिवस धरून) कालावधीत कोणत्याही व्यक्तीने, या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाची प्रकरणे चार व पाच यांच्या तरतुदींशी विसंगत अशी केलेली कोणतीही कारवाई किंवा वसुली यांसह केलेली कोणतीही गोष्ट ही रद्दबातल असल्याचे मानण्यात येईल आणि उक्त कालावधीत उक्त तरतुदींशी सुसंगत अशी केलेली कोणतीही गोष्ट ही, विधिग्राह्य, परिणामकारक व अखंडपणे अंमलात असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद),

**प. ग. पाटील,**
भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य.